# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## आस्थापना विभाग



वाचा:- १) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२०/(सं.क.)/(११४/२०)/विशि-१, दि. १४/०३/२०२०.

२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दि.१४/०३/२०२० रोजीचे पत्र.

## प रि प त्र क
### अति महत्वाचे व तात्काळ

शासनाने करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि. १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथ रोग प्रतिबंधात्कक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार दि.३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये सूचित करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठातील संलग्नित सर्व महाविद्यालये व विद्यापीठ परिसरातील सर्व संकुले येथील अध्यापनाचे कामकाज दि. १६/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहील त्यास्तव विद्यार्थ्यांनी वर्गास उपस्थित राहू नये. तथापि, इतर शैक्षणिक कामकाज सुरु राहिल याची नोंद घ्यावी व याबाबतच्या अधिकच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१) अध्यापना व्यतिरिक्त इतर शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजासाठी विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी यांनी नेहमीप्रमाणे कार्यालयात कार्यालयीन वेळेनुसार उपस्थित रहावे.

२) विद्यापीठाच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार सुरु राहतील.

३) विद्यापीठातील मुला व मुलींचे वसतीगृह दि. १६/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील. त्यानुसार संबंधित वसतीगृहाचे अधिक्षक/गृहपाल यांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

४) विद्यापीठातील तसेच रंगभवन येथील ग्रंथालय विद्यार्थ्यांसाठी दि. १६/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहील. त्यानुसार संबंधित विभागप्रमुखांनी/कर्मचाऱ्यांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

५) सर्व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापनाचे कामकाज दि. १६/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहील. तथापि, अध्यापना व्यतिरिक्त इतर शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी यांनी नेहमीप्रमाणे कार्यालयात कार्यालयीन वेळेनुसार उपस्थित रहावे.

६) सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांनी संबंधित महाविद्यालयात सुरु असणारे वसतीगृह व ग्रंथालय दि. १६/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद करण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावी.

(मागे पहा)

७) दि. १६/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंतच्या काळात पूर्व नियोजित कार्यशाळा, व्याख्याने व गर्दी करणारे कार्यक्रम रद्द करण्याबाबतची कार्यवाही संबंधित प्राचार्य, संचालक व विभागप्रमुख यांनी आपल्या स्तरावरुन करावी.

८) आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी संबंधित प्राचार्य, संचालक व विभागप्रमुख यांनी घ्यावी.

आदेशावरुन,

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
कुलसचिव

जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/परिपत्रक/२०२०/3545
दिनांक : 15 MAR 2020

१) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
२) मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
३) कुलसचिव यांचे कार्यालय
४) प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
५) संचालक/विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
६) विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
७) अधिक्षक/गृहपाल मुलांचे व मुलींचे वसतीगृह, प्रस्तुत विद्यापीठ
८) सुरक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

} सदर परिपत्रक आपल्या संकुलातील / विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.